245

राष्ट्रीय आरोग्य अभियान,
अलिबाग-रायगड.

**पदभरती जाहिरात.**

दि. 06/07/२०२१

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आरबीएसके कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेली पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने दि. ०५/११/२०२१ रोजी पर्यंतच्या कालावधी करीता खाली नमूद केलेल्या अटी व शर्ती च्या अधीन राहून भरणेसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यानुसार रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | पदनाम | शेक्षणिक अर्हता | नियुक्ती स्तर | मानधन प्रति महिना | एकुण पदे | जात निहाय पदांची संख्या (आरक्षण) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | Medical Officer RBSK (UG) Male | BAMS | अलिबाग १, पनवेल २, पाली १, मुरुड १, तळा १, श्रीवर्धन १, उरण १, खालापुर १, रोहा २, माणगांव १, महाड २, | रु. २८०००/- | १४ | अ.ज.३, वि.भ.ज.अ.१ वि.भ.ज.ड. १, इ.मा.व.२, ई.डब्ल्यु.एस. २ व अराखीव ५ | - |
| २ | Medical Officer RBSK (UG) Female | BAMS | तळा १, म्हसळा १, पोलादपुर १, माणगांव २, महाड २ | रु. २८०००/- | ७ | अ.ज.१, वि.भ.ज.ब.१, इ.मा.व. ३ व अराखीव २ | - |

❖ *अटी व शर्ती -*

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती दि. ०५.११.२०२१ पर्यंत राहील.

२) जाहिरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा व उमेदवाराची निवड झालेनंतर नियुक्ती आदेश प्राप्त झालेनंतर उमेदवाराने वर्तणूकीचा दाखला सादर करणे बंधनकारक असेल.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

६) जाहिरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो व रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. तसेच जात निहाय पदांची संख्या (आरक्षण) यामध्येही बदल होऊ शकतो.

७) सदर पदभरतीबाबतचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी रा.जि.प. अलिबाग यांनी राखून ठेवले आहेत.

८) सदर पदभरती ही कोविड १९ या साथीच्या प्रादुर्भावाच्या काळात होत असल्याने सर्व उमेदवारांनी त्यांचे अर्ज हे टपालाव्दारे अथवा समक्ष राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालयाबाहेरील अर्जपेटीमध्ये टाकणेचे आहेत. कोणत्याही उमेदवारांस कोणत्याही पदासाठी सादर केलेल्या अर्जावर पोहोच मिळणार नाही याची सर्व उमेदवारानी नोंद घ्यावी.

९) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा रुग्णालय, अलिबाग यांचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत येईल याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

१०) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

११) सदर पदांकरीता कौशल्य चाचणी अनिवार्य करणेत आलेली आहे. सदर पदांकरीता पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यापुर्वी त्यांची जिल्हा स्तरावर कौशल्य चाचणी घेण्यात येईल. व सदर चाचणी मध्ये उमेदवार पात्र ठरलेनंतर त्यास नियुक्ती आदेश देण्यात येतील. कौशल्य चाचणी मध्ये उमेदवार अपात्र ठरल्यास पुढील पात्र उमेदवारास कौशल्य चाचणी करीता बोलावण्यात येईल.

१२) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडील पत्र क्र.राआसोम/पदभरती/११६८२-७९२/२०२० दि.२१/०५/२०२० मधील मार्गदर्शक सुचनांनुसार जाहिरातीत नमुद केलेल्या विशिष्ट मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर गुणानुक्रमे सर्वात वर असणाऱ्या इतर कोणत्याही मागास प्रवर्गाच्या उमेदवाराची निवड करणेत येईल एकही मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध नसलेस खुल्या प्रवर्गातील उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करणेत येईल.

१३) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रदद् करणे/ पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही. व न्यायालयात जाता येणार नाही.

१४) वयोमर्यादा :- १८ वर्षे वय पूर्ण करीत असलेले उमेदवार अर्ज करु शकतात. अभियान अंतर्गत सेवाप्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुला प्रवर्ग ३८ वर्ष, राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरिता कमाल सेवा प्रवेश ५ वर्षापर्यंत शिथिल राहील.

१५) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत सत्यप्रतीसह आपले अर्ज राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा रुग्णालय, अलिबाग, रुम नं.२१३ येथे दि. 09/07/२०२१ ते दि. 19/07/२०२१ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत सादर करावेत. दि. 19/07/२०२१ रोजी सायंकाळी ५ नंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही.

१६) सदरहु भरती प्रक्रियेकरीता अर्ज स्विकारणेची अंतिम तारीख दि. 19/07/२०२१ ही राहणार असुन तदनंतर अर्जाची छाननी, पात्र /अपात्र यादी, हरकती/आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे,

गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे, निवड यादी प्रसिध्द करणे आदी रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानकडील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरतीप्रक्रिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे इ. बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा रुग्णालय, अलिबाग यांचे नोटीस बोर्डवर व मा.जिल्हाधिकारी यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१७) उमेदवारांनी जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्येच अर्ज सादर करावेत. खाली नमुद आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे -

- विहीत नमुन्यातील अर्ज
- शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्रे व गुणपत्रिका (पदवी/पदविका सर्व सत्रांच्या गुणपत्रिका)
- शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला
- NHM, शासकिय संस्था, विभाग, शासन अंगिकृत संस्थेतील अनुभवाचा दाखला
- जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र
- संबंधित पदाकरिता तत्सम कौन्सिलचे महाराष्ट्र राज्याचे नोंदणी प्रमाणपत्र (पर्मनंट) व नोंदणीचे नुतनीकरण
- पासपोर्ट आकाराचे २ फोटो
- उमेदवाराच्या नावांत बदल झाला असल्यास शासनाचे राजपत्र

१८) याशिवाय नियुक्त आदेश स्विकारताना उमेदवारांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या सर्व शैक्षणिक व इतर कागदपत्रांच्या मुळप्रती सादर करणे बंधनकारक राहील. मुळप्रती सादर न केल्यास सदर उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्ठात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक :-

ठिकाण :-

30/6/2021

सदस्य सचिव
निवड समिती
तथा,
जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

सदस्य
निवड समिती
तथा,
जिल्हा शल्यचिकित्सक,
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

डॉ.किरण पाटील, (भा.प्र.से.)
अध्यक्ष,निवड समिती
तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.